# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन (दक्षिण कक्ष),बेलापूर,नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६


---

जा.क्र.मजीप्रा/संकलन/वित्त २/नोटीसा/सी आर ३५६/ १४ दि. २८.०३.२०२२

## प्रसिध्दीपत्रक

**विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाचे आयकर अंतर्गत १२AA करीता नूतनीकरण करणे व प्राप्त होणाऱ्या विविध प्रशासकीय विभागांकडील नोटीसा निकाली काढणे.**

अ. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालयास आयकर, वस्तू व सेवा कर (पूर्वीचे सेवा कर) इ. बाबत संबंधित प्रशासकीय विभागांकडून विविध कालावधीच्या नोटीसा प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्रापत होणाऱ्या नोटीसा निकाली काढण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करावयाची आहे. त्यामध्ये खालील कामाचा समावेश होतो.

- मध्यवर्ती कार्यालयास प्राप्त होणाऱ्या नोटीसांबाबत विहित मुदतीत अभिप्राय ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने सादर करणे.
- प्राप्त होणाऱ्या नोटीसांच्या अनुषंगाने आयोजित होणाऱ्या सुनावणीकरीता निश्चित केलेल्या दिनांकांना उपस्थित रहाणे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची बाजू मांडणे.
- प्राप्त होणाऱ्या नोटीसा लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे व कार्यपूर्तता अहवाल सादर करणे.

**ब. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आयकरकरीता १२AA चे नूतनीकरण करणे.**

- दरपत्रके सादर करताना खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
- नोंदणीकृत सनदी लेखापाल यांनीच संस्थेच्या लेटरहेडवर व्दिनोंद पध्दतीने दरपत्रके सादर करावीत.
- दोन्ही कामांकरीता येणारा खर्च हा दरपत्रकात स्वतंत्र दर्शविण्यात यावा.
- दरपत्रके सादर करताना त्यातील दर हे सर्व करांसहित व इतर अनुषंगिक खर्च विचारात घेवून सादर करावेत.
- सनदी लेखापाल यांचा कमीत कमी ०५ वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे. तसेच यापूर्वी केलेल्या
- कामाचा तपशील दरपत्रके सादर करताना नमूद करावा.

याबाबत सदरचे प्रसिध्दीप्रत्रक झाल्याच्या दिनांकापासून **दि.: ०५/०४/२०२२ पर्यंत** दरपत्रके सादर करावीत.

(राजेंद्र मडके)
संचालक (वित)
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई.

प्रत माहितीस्तव :

१) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई -२१ यांना माहितीस्तव.

२) अधिक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मित्तल टॉवर्स, मुंबई -२१

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहिस्तव :

३) उप अभियंता (आय टी सेल) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई

उपरोक्त प्रसिध्दीपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.